ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## December Special Issue : III - 2022



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com
Editor
Prof.Dr.Sadashiv H. Sarkate

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

**Editor**
**Dr. Sadashiv H. Sarkate**

**• Mailing Address •**
**Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor : POWER OF KNOWLEDGE**
**Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 1000/-**

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC

ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

December Special Issue III 2022

Editorial Officer
**Kranti Publication**
Georai Dist.Beed
Beed -431 127
Contact : 7875827115
**E-mail :** Sarkatelata@gmail.com

**Published By :**
Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Vice Chancellor M.G.M.U. Aurangabad
& Ex.Vice Chancellor Y.C.M.U. Nasik
& Professor of Mass Communication
& Jornalism Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr.Pratibha Aher**
Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

## EDITOR

***Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Associate Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed.

## EDITOR BOARD

**Dr. Mala Nurilmala**
Dept.of Aquatic Product Technology
Faculty of Fisheries and Marine Sciences
Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept.of Zoology
Swa.Sawarkar Mahavidyala, Beed

**Dr. Vasant Biradar**
Princial, Mahatma Phule
Mahavidyalaya,Ahmedpur,Dist.Latur

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.D.P. Takale**
Professor & Head
Dept. of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Ganesh Adgaonkar**
Kalika Devi ,Collage
Shirur Kasar Dist.Beed

**Dr.Aparna Ashtaputre**
Dept. of Psychology,
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr. Vitthal S. Jadhav**
Dept. of Pub.Administration,
Kalikadevi College, Shirur (K.), Dist.Beed

**Dr. Kadam Mangal S.**
PG. Dept.of Zoology
Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad'

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College, Mantha.
Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science College,
Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr.Fulchand Salampure**
Management Council Member
**Dr.B.A.M.U.Aurangabad**

## PEER REVIEW / REFERECS

**Dr.Shahaji Gaikwad**
Ex-Chairman, BOS in English
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha
Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology
Deogiri College, Aurangabad

**Dr. Santos Chavan**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Laxmikant Shinde**
Assit.Professor
JES College, Jalna

## MANGING EDITORS

**Mr. Ramesh Ringne**
**Prof. Bapu Ghokshe**
**Mr. Shivaji Kakade**
**Dr. Shakur Shaikh Husain**

**Mr. Vinod Kirdak**
**Dr. Datta Tangalwad**
**Mr. Kalandar Pathan**
**Dr. Suhas Morale**
**Dr. Baliram Katare**

**Assit.Prof.Mohan Kalkute**
**Dr. Adgaonkar Ganesh**
**Dr. Santosh Chavan**
**Dr. Rajkumar Yallawad**

| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | २००० नंतरची स्त्रियांची मराठी कविता | डॉ.समिता जाधव | 1-5 |
| 2 | नव्या प्रवृत्तीचे चित्रण करणारी कादंबरी | डॉ.गणेश मोहिते | 6-8 |
| 3 | २००० नंतरचे मराठी स्त्रीलिखित नाटके - एक आकलन | प्रा.डॉ. प्रल्हाद दत्तराव भोपे | 9-14 |
| 4 | ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे कथाकार भास्कर बडे | प्रा. डॉ. आर. एस. बडुरे | 15-18 |
| 5 | डॉ.पंजाबराव देशमुख व ग्रामीण साहित्य चळवळ: पुनर्विचार | डॉ.वासुदेव भाऊसाहेब ऊगले | 19-22 |
| 6 | २००० नंतरची मराठी कादंबरी : एक अभ्यास | प्रा.डॉ.रामहारी मायकर | 23-25 |
| 7 | इ.स. २००० नंतरच्या स्त्रीवादी साहित्याचे स्वरूप | डॉ०खाडप संजय बाबुराव | 26-30 |
| 8 | २००० नंतरच्या दलित कवयित्रींच्या कविता: स्वरूप व विशेष | डॉ.अंकुश रामराव काळे | 31-35 |
| 9 | २००० नंतरच्या स्त्रीवादी साहित्याचे स्वरुप | प्रा.डॉ. आवारे सी.एस. | 36-40 |
| 10 | स्त्रीवादी कवितेतून व्यक्त होणारी सामाजिकता | डॉ.गणपती जोतीबा मोरे | 41-45 |
| 11 | दुर्लक्षित मुक्या माणसांचे दुःख बोलके करणारी कविता : न्हांगूळ आदार ईला | प्रा.डॉ. व्यंकटी पावडे | 46-51 |
| 12 | 'बारोमास' : शेतकऱ्या समोरील विविध आव्हाने | श्रीराम विलास तिडके | 52-54 |
| 13 | २००० नंतरच्या स्त्रीवादातून निर्माण झालेल्या कविता | प्रा.डॉ. लतिका महादेव कट्टीमनी | 55-61 |
| 14 | २००० नंतरच्या ग्रामीण कवितेवर जागतिकीकरणाचा प्रभाव | प्रा. पंडित मोरे | 62-65 |
| 15 | समकालीन वास्तवतेचा आलेख रेखाटणारी कविता : मी सार्वकालिक सर्वत्र | प्रा. दिलीप ज्ञानोबाराव भिसे | 66-70 |
| 16 | प्रौढ साक्षरता अभियानाची शोकांतिका मांडणारी कादंबरी : निशाणी डावा अंगठा | प्रा. पुरुषोत्तम एस. निर्मळ | 71-75 |
| 17 | इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतील 'अस्सल' ग्रामीणत्व | प्रा. वंदना शामराव खोराटे | 76-82 |
| 18 | २००० नंतरची ग्रामीण कथा | प्रा.संदीप परदेशी | 83-85 |
| 19 | जागतिकीकरण आणि समकालीन कविता | डॉ.दत्ताराम राठोड | 86-92 |
| 20 | दुष्काळाचे चित्रण करणारी कादंबरी पांढर | डॉ. छोटू देवपुरी पुरी | 93-99 |
| 21 | २००० नंतरच्या मनमौन कवितासंग्रहातील कृषिजीवन | डॉ.बालाजी विठ्ठलराव डिगोळे | 100-103 |
| 22 | आदिवासी कवितेतील बदलते जीवन | डॉ.विठ्ठल केदारी | 104-108 |
| 23 | शेती प्रश्नांना मुखर करणारी २००० नंतरची ग्रामीण कविता | डॉ.वैजनाथ पंडितराव कदम | 109-115 |
| 24 | गोठण कादंबरीतील भाषेचे स्वरूप | डॉ.सरला गोरे | 116-119 |
| 25 | 'पितळ' कथासंग्रहातून आलेले स्त्रीजीवन चित्रण | डॉ. सुधाकर पंडितराव बोथीकर | 120-125 |
| 26 | २१व्या शतकातील गतिमान कादंबरी | डॉ.दत्ताराम राठोड | 126-131 |
| 27 | २००० नंतरचे शेतकऱ्यांचे वास्तव जीवन आणि लेखक | डॉ. ज्ञानेश्वर को.गवते | 132-135 |
| 28 | 'वळंबा' या आत्मकथनातील संघर्षाचे स्वरूप | डॉ.ललिता मानसिंग गोपाळ | 136-141 |
| 29 | इसवी सन २००० नंतरच्या मराठी साहित्यातील बदलत्या जीवन जाणीवांमागील सामाजिक पार्श्वभूमी | डॉ निलेश एकनाथराव लोंढे | 142-148 |

# ‘पितळ’ कथासंग्रहातून आलेले स्त्रीजीवन चित्रण

डॉ. सुधाकर पंडितराव बोथीकर,
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
लालबहादूर शास्त्री मविद्यालय, परतूर जि. जालना

**प्रास्ताविक :**

२००० नंतर मराठी साहित्याची संख्यात्मक तसेच गुणात्मक वाढ होऊन आलेले अनुभव कथेतून मांडत लेखक आपले जीवनदर्शन घडवू लागले. एकूण ग्रामीण व दलित कथेच्या तुलनेत आदिवासी कथालेखक संख्येने कमी आहेत तरी त्यांची कथा गुणात्मकदृष्ट्या सरस असून या कथा पूर्वीच्या कथानकापेक्षा अधिक दाहक अनुभव मांडणाऱ्या आहेत. संजय दोबाडेंच्या ‘पितळ’ कथासंग्रहात १८ कथा समाविष्ट आहेत.

या देशातील आदिवासी हा स्वतंत्र मूल्यव्यवस्था निर्माण करून जगणारा विकसित समूह आहे. नागरी समाजात ज्या मानवाच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी असतात त्या आदिवासी समाजात पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या आहेत. त्यांच्या विकासात त्यांनी भाषेची निर्मिती केली आहे. विवाह व्यवस्था, कुटुंब व्यवस्था निर्माण करून एक संस्कृती निर्माण केलेली आहे. त्यात अनेक अशा बाबी आहेत ज्या नागरी समाजात आज आपणास सापडत नाहीत. नागरी समाजाच्या अनेक दृष्ट प्रथा आहेत, ज्या आदिवासी समाजात आजही नाहीत. मातृभाषेतून शिक्षण दिले पाहिजे असे म्हणतांना आदिवासींच्या मातृभाषेला आपण विचारात घेत नाहीत. दोबार्डेच्या या कथासंग्रहात त्याचा संबंध येतो. शिक्षकालाच त्यांची भाषा समजत नाही. डवर, डोशी, बांडगी शब्दांचा अर्थ शोधण्यास शिक्षकाजवळ डिक्शनरी नाही. मिरचीला तो मीठ म्हणतो आणि मिठाला गारा हा संस्कृती संघर्ष आणि संस्कृती समन्वयाचा मुद्दा दोबाडे यांच्या कथेचा एक भाग कथानकाच्या अनुषंगाने येतो, तो अधिक महत्त्वाचा आहे. तो केंद्रबिंदू बनवून दोबाडे यांची कथा फुलत जाते ‘गुरूजी माझ्याशी लगीन करशील’ असा प्रश्न प्रमिला, पवार शिक्षकास विचारते. पती निवडण्याचे स्वातंर्त्य आदिवासी स्त्रीला आहे, आदिवासीत्तर स्त्री परंपरा हे स्वातंर्त्य देत नाही, हेही येथे लक्षात घेण्यासारखे आहे. पवारांना ते धक्कादायक वाटते कारण पवार हे स्त्रियांना स्वातंर्त्य न देणाऱ्या समाजाचे प्रतिनिधित्व करणारे आहेत. शिक्षित आदिवासी तरूण लेखकाने हा संस्कृती संघर्ष साहित्यातून चित्रित केल्याचे दिसून येते. दलित साहित्याच्या चळवळीने एक काम केले आहे, ते म्हणजे समाजातील कुठल्याही शिक्षित तरूणाला आपण लिहू शकतो हा विश्वास दिला. आदिवासी साहित्यातही स्वतःचा चेहरा शोधणारे साहित्य निर्माण झाले आहे. आदिवासीच्या जीवन संघर्षाला शब्दबद्ध केले आहे. बिरसा मुंडा, तंट्या भिल्ल यासारख्यांचा शोध घेऊन स्वतःच्या इतिहासाला कथन करण्याचा प्रयत्न यातून झाला आहे. आदिवासी भाषा, संस्कृती, कला या सर्वांचा अभ्यास आदिवासी तरूण लेखकाला एखाद्या सागरासारखा उपलब्ध झालेला आहे. संजय दोबाडे या कथा लेखकाने भोवतालचे वास्तव पितळ कथासंग्रहातून

वाचकांसमोर मांडले आहे. या कथानकाची पार्श्वभूमी ही डोंगरदऱ्यात पसरलेल्या या भागातील गरीब असहाय्य अशा माणसांच्या हालअपेष्टांची ही कथा आहे. या कथांतील जवळजवळ सर्व व्यक्ती या प्रस्थापित व्यवस्थेला बळी पडलेल्या आहेत. त्यांचा लढा हा दारिद्र्याशी आहे. हे दारिद्र्य येथील व्यवस्थेने त्यांना बहाल केलेले आहे. केवळ जगण्यासाठी आवश्यक असलेल्या दोन वेळच्या भाकरीसाठी त्यांच्या वाट्याला ही लाचारी, असहाय्यता आलेली आहे. या जीवघेण्या जीवनाचा शेवट हा मृत्यूतच होतो. त्यामुळे ही सर्व माणसे पराभूत होतात ते संघर्षाला तयार नसतात.

कोंडाजीला माळेगावच्या सरपंचाकडे जेवणाचे बिल मागितले ते महागात पडते आणि त्याचा परिणाम त्याचे हॉटेल जाळण्यात होतो. बायको काशी कोळी वेडी होऊन भीक मागू लागते तर कोंडाजी परांगदा होतो.

बायकोला बैलाने मारले अन त्यावरील औषध उपचारासाठी आयुष्यभर गुलामी करूनही दगडू शेठकडून पैसे मिळत नाहीत. चोरी करून हॉस्पिटलचा खर्च भागवूनही बायकोला वाचवू शकत नाही.

स्वतःच्या शेताची राखण करताना देव भक्तांकडून तुडवल्या जाणाऱ्या पिकासाठी प्रतिकार करणाऱ्या शिवाला बळी जावे लागते. आपला स्वाभिमान टिकवताना गण्या मन्याला वश न होण्याची किंमत करणी करणारी भुताळी म्हणून गावातील माणसांकडून ठार मारलेली तुळसा अशा अनेक कथा नायक-नायिका या परिस्थितीचे बळी ठरतात.

संजय दोबाडेंनी अशा सामान्य माणसांच्या जीवन-मरणाच्या परिस्थितीचे चित्रण या कथांमधून केले आहे. या कथांमधून लेखकाने ग्रामीण भागातील सर्वसामान्य आदिवासी माणसांचा जीवघेणा प्रवास उभा केला आहे. या सर्व कथा केवळ काल्पनिक कथानिर्मिती वाटत नाही तर त्या त्या गावी घडलेल्या सत्य कथा आहेत असे वाटते.

दोबाडे घटनांना कथारूप देण्याचा प्रयत्न करतात, असे फार तर आपणास म्हणता येईल. या कथांमधून खलनायक म्हणून पुढे येणारी विशिष्ट परिस्थिती आहे. त्यातून निर्माण झालेले दुःख हे मानवाने निर्माण केलेले आहे. उदा. शिवाचे मरण. शिवा मारला गेला कारण काय तर देवभक्तांनी रस्त्याने जावे. आपल्या पिकाला नष्ट करू नये. अशी त्याची भूमिका आहे. तो श्रद्धाळू आहे. देव आणि त्यांच्या भक्तांबद्दल त्याच्या मनात आदर आहे. प्रेम आहे. तरीही त्याचे पीक ते तुडवून जाऊ लागतात. तेव्हा तो विनवणी करतो. त्याचा काहीच उपयोग होत नाही. तेव्हा तो एका देवभक्तावर काठी चालवतो. त्याचा परिणाम हिंस्र पशूंनी एखाद्या सावजावर हल्ला करावा तसा देवभक्त करतात व त्यात शिवा ठार मारला जातो. हे विधिलिखित नाही. त्यातील विरोधाभास, त्यातील विसंगती कथालेखक वाचकांसमोर आणतो. बम बम बोले म्हणत देवदर्शनासारख्या पवित्र कार्यास जाणारा हा समूह झुंड बनतो. गरीब शेतकऱ्यास ठार मारतो. देवभक्तांचा समूह सामान्य माणसाचा मुडदा पाडण्यासाठी बेभान होतो. पवित्र आणि क्रौर्य यांच्यातील हा नातेसंबंध कोणत्या नात्याने व्यक्त करावा असा प्रश्न या कथेतून लेखक वाचकांपुढे आणतो. तो प्रश्न

आपल्या अंतःकरणाला छेदून गेल्याशिवाय राहत नाही. मानवनिर्मिती दुःखाला निवारण्याचा मार्ग कोणता याचा शोध घेण्यास ही कथा वाचकास प्रवृत्त करते.

'तुळसा' या कथेत आदिवासी समाजात चालत आलेल्या जादूटोण्याच्या विश्वासाच्या परंपरेचा इथे उल्लेख करण्यासारखा आहे. करणीसारखा प्रकार व त्यावर त्या समाजाचा असलेला प्रचंड विश्वास हा या घटनेचा अनाकलनीय भाग आहे. भगत हा तसा दुःख निवारण करणारा घटक त्याच्या आधाराने हा समाज वर्षानुवर्षे जगत आलेला आहे. वनऔषधीचा त्याला एक संदर्भ आहे. तसाच तांत्रिक मंत्राच्या शक्तीचाही एक संदर्भ आहे. ती मोठी परंपरा आहे. पण त्याला विज्ञानाचा संदर्भ आज उरलेला नाही. त्यासंबंधीचे ज्ञान खेड्यात जाणे आवश्यक आहे. पण ते नसल्यामुळे जारण-मारण विद्या म्हणून तिला मान्यता असल्यामुळे तुळसासारखी कर्तृत्ववान व चारित्र्यवान स्त्रीही गावगुंडांच्या षडयंत्राचा भाग कसा बनते, हे या कथेतून फार चांगल्या व तपशीलवार पद्धतीने कथा लेखकाने विशद केलेले आहे.

'राजकारण' असे या कथेत  खेड्यातील वास्तवाशी दोबाडे किती जवळ आहेत, याचाही प्रत्यय या कथेतून येतो. भारतीय राजकीय क्षेत्रात महिलांचे प्रतिनिधित्व योग्य असावे. म्हणून राखीव जागेचा परिघ वाढविला आहे. पंचायत क्षेत्रात पन्नास टक्के महिला आरक्षण लागू आहे. त्यातून अनेक संघर्ष राखीव जागा समर्थक व विरोधक यांच्यामध्ये सुरू असतात. येथे बायकांचे अधिकार नवरेच वापरतात. इथपासून ते बाईच्या हाताखाली आम्ही काम करणार नाही. पण ''सदाची आई मोठी धीराची बाई होती. नवरा मेल्यानंतर सगळे आयुष्य तिने उघड्या कपाळाने काढले. सदाला वाढवले, चांगले शिकवले, मोठे केले. तिच्या दिराने, जावेने तिला घराबाहेर काढण्याचा प्रयत्न केला, पण ती गाव सोडून गेली नाही. ती गेली असती तर त्याने तिची जमीन बळकावली असती. सदाच तिच्या जगण्याचा एकमेव आधार होता. त्याला ती जिवापाड जपत होती. त्याला कुठे दुखले-खुपले तर लगेच घाबरी व्हायची''[१] तिने आपल्या मुलाला रक्ताचे पाणी करून वाढवले होते. हे करत असताना सगळीकडे तिला त्रास होत होता, पण या त्रासाची तिने कधी तक्रार केली नाही. काळजाचे पाणी करून आपले आयुष्य मुलासाठी पणाला लावले होते.

'बम बम भोले' या कथेत शिवा कष्ट करणारा शेतकरी. परंतु तिर्थाटन करणारा भोंदू साधूंचा कळप त्याच्या शेताच्या बांधावरून जाताना शिवासोबत झालेल्या झटापटीत शिवाचा मृत्यू होतो. आणि शिवाची पत्नी पार्वतीला मात्र विधवेचे आयुष्य जगावे लागते.

शिवा आणि पार्वतीच्या सुखी संसाराला या साधूंच्या रूपाने नजर लागलेली होती. इथून पुढे पार्वतीच्या आयुष्याची फरफट चालू झाली होती.

'करणी' कथेत तुळसा या दुर्दैवी स्त्रीची जीवन व्यथा लेखकाने मांडली आहे. लक्ष्मीच्या पावलांनी उंबरठ्यावरचे माप ओलांडून सासरी आली तेव्हा सर्वांनी तिचे कौतुक केले. नव्याचे नऊ दिवस संपले आणि तिच्या घोर कष्टांना सुरुवात झाली. घरकाम आणि शेतीकाम यातच तिचा पूर्ण दिवस संपायचा

तरीही ती सुखी होती. तिच्या सुखी संसारात अजून एका सुखाची भर पडणार होती.

आपल्या झाडावर दुसऱ्या मुलुखातले वेगळ्या जातीची पाखरू आले की इतर पक्षी जसे त्याला टोचून मारतात, हुसकावून लावतात. तसे माणसांचे नसते. गावाने तिला आपल्यात सामावून घेतले. इथे ती मोलमजुरी करून पोट भरु लागली. ती एकटी असल्याने "लहान मुलांना खेळताना, बागडताना पाहून तळसाला त्यांच्यात तिला आपली मुलगी दिसायची. एकटीच कुढायची, आपल्या दुःखावर मात करण्यासाठी ती सर्वांना जवळ करायची. मुलांत मूल होऊन खेळताना क्षणभर ती आपलं दुःख विसरायची. पण, शेजारच्या चिमीवर तिचा भारी जीव होता. दोघींनाही एकमेकींचा इतका लळा लागला होता, की अनोळखी माणसे त्या दोघींना माय लेकीच समजायचे. तुळसा एकटीच राहायची. तिचा इतिहास फारसा कुणाला माहित नव्हता. तीही जुन्या आठवणी सांगायला फारशी खूश नसायची. उगाच खपल्या काढून जखम चिघळण्याची तिला भीती वाटायची. हसून, बोलून संबंध टिकवायची कला तिला चांगलीच अवगत होती. तिच्या या सौजन्यशील वृत्तीचा सोयीस्कर अर्थ काही गावकऱ्यांनी घेतला होता. त्यांच्या चेष्टा मस्कऱ्यांकडे दुर्लक्ष करायची. मग तर ते अधिकच चेकाळायचे. गण्या आणि मन्याला तिच्या अशा वागण्याचं नवल वाटायचं. ते तिच्या प्रत्येक कृतीचा वेगळा अर्थ घ्यायचे. आपल्याला इशारे करते, म्हणजेच नक्कीच कुठेतरी पाणी मुरतं असणार. शिवाय ती एकटी बाई आपलं काय वाकडं करणार ? असा विचार करत ते तिच्याशी लगट करू लागले. एक दिवस तिने दोघांनाही चांगलंच खडसावलं. तुळसाने केलेला अपमान त्यांच्या जिव्हारी लागला. याचा सूड घेत, तिला बदनाम करण्याची संधी ते शोधत राहिले"[२] यामध्ये दोन-तीन वर्षे निघून गेली. तुळसाचे चिमी सोबतचे संबंध अधिकच घट्ट होत गेले.

तुळसाने गावातील एकाची शेती मक्त्याने करण्यास घेतली. शेतीतून तिला काही उत्पन्न मिळत होते. तेवढ्यात तुळसाच्या नवऱ्याने गावातील घर आणि जमीन विकून गावाची असलेली नाळ तोडून टाकली. तुळसालाही तिचा हिस्सा दिला. त्या पैशातून तुळसाने काही दागिने आणि नवीन कपडे खरेदी केले. यामुळे गावातील नतद्रष्ट मंडळी तुळसावर जळू लागली.

तिच्या जवळ इतके पैसे आणि धन कुठून आले, याबद्दल तर्कवितर्कांना उधाण आले. ती आपल्या घरातील धान्य तिच्या घरात जादू करून नेते, असे काही मंडळी म्हणू लागली. "गण्या आणि मन्या तर छाती ठोकपणे रांड असल्याचा दावा करायचे"[३] पण तिला विचारण्याची कोणात हिंमत नव्हती. "लोक आपल्याला भुताळी, चेटकीण, रांड वगैरे म्हणतात. एवढे मात्र, तिला माहित नव्हतं"[४] अशातच तिचा सातपूरला गेलेला नवरा आणि तिची भांडकुदळ सवत यांचे रोज भांडण व्हायचे. त्या रांडेला माझ्यापेक्षा जास्त वाटा का दिला? अशी तिची रोजची कटकट असायची. कंटाळून नवरा दारूच्या आहारी गेला. असाच पिऊन पडला आणि तिथेच मरून गेला. यामुळे "तुळसावर तर दुःखाचा पहाड तुटला. लांब राहत असला तरी कपाळी कुंकू लावण्यासाठी का होईना पण नवरा होता. आता तोही आधार तुटला. रडतच नवऱ्याच्या मयतीला गेली. पण सवतीने तिला हात लावू दिला नाही की शेवटचं दर्शनही घेऊ दिलं नाही. उलट "तूच माझा नवरा

मारला' असं म्हणून तिला हाकलून लावलं"[५] यामुळे तुळसाविषयीच्या चर्चेला लोकांमध्ये उधाण आले. स्त्रियांमध्ये तिच्याविषयी अधिकची कुजबूज होऊ लागली.

एकेदिवशी सायंकाळी दोघेही दारू पिऊन तुळसाच्या घरी गेले. गावात तिच्याबद्दल लोक काय काय विचार करतात, याविषयी तिला सांगत आपल्या बाजूने वश करण्याचा प्रयत्न करतात. "ती आपल्याला पूर्णपणे वश झाली आहे, असं वाटून मन्या बोलला त्याच्यासाठी... तुला आमच्यासंग... तुला एक... आमच्या संघ एक रात्र..."[६] यापुढचे शब्द ओठावर येण्याच्या पहिले तुळसाने मन्याच्या मुस्कटात ठेवून दिली. दारू जास्त झाल्यामुळे तिचा प्रतिकार ते रोखू शकले नाहीत. तुळसाने एकेकाची गच्ची पकडून त्यांना घराबाहेर काढले होते. तुळसाचा अवतार पाहून त्यांच्या उरात धडकी भरली होती. तिचा पारा अजूनही शांत झाला नव्हता. "आतमध्ये वाघीण गुरगुरत होती आणि बाहेर कुत्रे भुंकत होते."[७] तुळसे भवानी नाही तुला गावातून नागडी करून फिरवली तर नावाचा मण्याच नाही मी, असे ओरडत गेले. आत 'तुळसाच्या रागाची जागा आता अश्रूंनी घेतली होती. वांझोटी तर ती होतीच पण नवरा टाकीही झाली. सुखाच्या शोधात ती इथे आली तर या गावाने भुताळी, वेश्या ठरवून संबंध तोडून टाकले. राहून राहून ती उसासे टाकत होती. सासरचे गाव सोडून आपण इथे आलो, तर हे गाव त्यापेक्षाही वाईट निघालं. गाव सोडून कुठे जावं ? गिधाडे तर सगळीकडंच असत्यात. तिकडंही गण्या-मन्यासारखे लांडगे भेटले तर ? सासरच्या गावी परत जाऊन तिला आपला स्वाभिमान विकायचा नव्हता. आणि माहेरचा आधार तुटला होता."[८]

'खुरासण्याची फुले' कथेतील तारा पिंपळदच्या केरू झुल्याची एकुलती एक मुलगी. लाडाकौतुकात वाढवत तिच्यावर आई-वडिलांनी चांगले संस्कार केले. शाळेत हुशार होती पण परिस्थितीमुळे पुढे शिकता आले नाही. मुलीच्या जातीला कितीही शिकवले तरी ते 'परक्याचं धन' असे समजून एक दिवस आई-वडिलांनी परक्याचे धन परक्यांच्या हवाली केले आणि आपल्या जबाबदारीतून मोकळे झाले. ताराचा पती विठ्ठल जबाबदार, कामात चतुर होता. सातपूरच्या कार्बन फॅक्टरीत नोकरीस होता. विठ्ठल-ताराचा राजा-राणीचा संसार सुखाने चालला होता, पण सगळे दिवस सारखे नसतात. त्यांच्या सुखी संसाराला अचानक ग्रहण लागले. कार्बन फॅक्टरीत मोठा अपघात झाला. त्यात विठ्ठलचा पाय निकामी झाला.

कंपनीकडून थोडी मदत मिळाली. परंतु ती किती दिवस पुरणार. शेवटी ताराने मजुरीला जायचे ठरवले. कामावरील पुरुषी नजरा तिला विंचवासारख्या डंख मारायच्या पण नाइलाजाने का होईना तिला काम करावे लागत असे. काम नाही केले तर उपाशी राहण्याची वेळ येत असे. तिच्या घरातील लहान मोठ्या वस्तू केव्हाच गहाण ठेवल्या होत्या. शेवटी चोरीचा मार्ग तिला जवळचा वाटला.

ढवळू पैलवानाच्या शिक्षेपेक्षा आपल्या चोरीचा गावभर बोभाटा होईल याचीच तिला अधिक भीती वाटत होती. ढवळू पैलवानाने तिला पकडून ठेवल्याने पळून जाता येत नव्हते. "मला सोडून दे ढवळू दादा यानंतर तुझ्या शेतात मी कधीही येणार नाही"[९] असे विनवणीच्या सुरात तारा म्हणाली. त्यावर ते सगळे ठीक आहे. पण, झालेले नुकसान कोण भरून देणार असे म्हणून ताराच्या सर्वांगावरून त्याची नजर फिरत

होती. तारा म्हणाली मी तुझी सगळी नुकसान भरपाई चुकती करीन. पण मला आता सोड, असे म्हणताच ढवळू पैलवान म्हणाला. "तुझी इच्छा आसंल तर तू आताच सगळी फेडबाकी करून टाकू शकतेस"[१०] असे म्हटल्यावर ताराच्या लक्षात आले नाही. "पैसे नसले म्हणून काय झालं ताराराणी ? लाख मोलाची जवानी तर हाय ना ? ढवळू पैलवान तिच्या गालावर हळूच चापटी मारत म्हणाला"[११] तिने त्याचे म्हणणे एका क्षणात धुडकावून लावले. यावर ढवळू पैलवानाने तिच्या गालावर एक ठेवून दिली. ताराच्या डोळ्यांसमोर अंधारी येवून ती खाली जमिनीवर कोसळली. क्षणभर तिचे डोके बधीर झाले. शुद्धीवर येताच पैलवानाला मारण्यास सज्ज झाली. उद्या गावभर माझ्या नावाची बदनामी करेल. आणि "आपली अब्रू चव्हाट्यावर टांगली जाईल"[१२] पण एवढ्यासाठी लांख-मोलाची इज्जत पणाला लावणे शक्य नव्हते. आता मात्र दोन्ही बाजूंनी ती अडकलेली होती. कितीही विरोध केला तरी तो राक्षस तिला सोडणार नव्हता. 'काहीच न उमजून ती गप्प घुम्यासारखी उभी होती. ती तिच्या मौनातच पैलवानाने होकार गृहीत धरला. त्याने तिच्या पदराला हात घातला. "मेलेल्या जनावराचे लचके तोडणाऱ्या गिधाडासारखा ढवळू पैलवान तिच्यावर तटून पडला. अश्रू ढाळण्या पलिकडे ती काहीच करु शकत नव्हती. विखुरलेले कपडे गोळा करून ती नेसू लागली."[१३] खुरासण्याच्या फुलांच्या बदल्यात ढवळू पैलवानाने ताराच्या स्वाभिमानाचा, तिच्या अब्रूचा लिलाव केला होता.

**संदर्भ टिपा :**


१) दोबाडे संजय, पितळ, समाज प्रबोधन संस्था प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती, ऑक्टोबर २०११, पृ.३

२) तत्रैव, पृ.३८ व ३९

३) तत्रैव, पृ.४०

४) तत्रैव, पृ.४०

५) तत्रैव, पृ.४०

६) तत्रैव, पृ.४२

७) तत्रैव, पृ.४२

८) तत्रैव, पृ.४२ व ४३

९) तत्रैव, पृ.६८

१०) तत्रैव, पृ.६८

११) तत्रैव, पृ.६८

११) तत्रैव, पृ.६८


◈◈◈